## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयात व स्वायत्त महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविला जात आहे. अशा महाविद्यालयांच्या प्राचार्यांसोबत यावर्षीपासून लागू होणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भातील अडचणी सुकाणू समितीच्या सदस्यांनी जाणून घेतल्या.

महाराष्ट्र शासनाने नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्थापित केलेल्या सुकाणू समितीमध्ये कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, सेवानिवृत्त प्राचार्य अनिल राव यांचा समावेश आहे. या दोन्ही सदस्यांनी सोमवार दि. ३ जुलै रोजी पदव्युत्तर अभ्यासक्रम ज्या महाविद्यालयात शिकविला जातो. त्या महाविद्यालयातील प्राचार्यांसोबत संवाद साधला. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू होत आहे. या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी प्राचार्यांकडून जाणून घेण्यात आल्यात. फिल्डवर्क, प्रोजेक्ट, वर्कलोड, प्लेसमेंट, अभ्यासक्रमाचा आराखडा, मेजर व मायनर विषय या संदर्भात प्राचार्य तसेच प्रशाळेचे संचालक यांनी आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. यावेळी बोलतांना कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीची रचना तयार असून विषय निहाय तयारी अंतीम टप्प्यात असल्याची दिली. प्राचार्य अनिल राव यांनी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये सुकाणू समितीचे सदस्य धोरण राबवितांना येणाऱ्या अडचणी जाणून घेत असून या आठवड्यात सुकाणू समितीच्या बैठकीत या अडचणींचे निराकरण करण्यावर भर दिला जाणार असून राज्यशासनाकडे त्या संदर्भातील अहवाल दिला जाईल अशी माहिती दिली. याचर्चेत प्रा. मुक्ता महाजन, प्रा.ए.एम. महाजन, अधिष्ठाता प्राचार्य एस.एस. राजपूत, प्राचार्य ए.पी. खैरनार, प्रा. अनिल डोंगरे, प्राचार्य एस.एन. भारंबे, प्रा. भुपेंद्र केसुर, प्रा. मधुलिका सोनवणे, प्रा.जे.बी. तलवारे, प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघुळदे, डॉ.ए.जी. जयस्वाल यांनी भाग घेतला. प्रा.एस.टी. इंगळे यांनी आभार मानले व सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. सुनील पाटील यांनी केले.

## बातमी नं. २

### भाषा अभ्यास प्रशाळेचे तीन विद्यार्थी सेट परीक्षा उत्तीर्ण

जळगाव दि. ३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळेच्या विद्यार्थ्यांनी एप्रिल – २०२३च्या सेट परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केले आहे.

भाषा अभ्यास प्रशाळेतील इंग्रजी विभागाच्या श्वेता साळी व अमोल जावरे या विद्यार्थ्यांनी सेट परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. तसेच हिंदी विभागातील वंदना पवार या विद्यार्थिनीला सेट परीक्षेत यश मिळालेले आहे. भाषा अभ्यास प्रशाळेत ऑडिट कोर्स अंतर्गत नेट सेट तयारीचा अभ्यासक्रम तर आहेच, पण त्या व्यतिरिक्त प्रशाळेतील अध्यापक वर्ग सातत्याने विद्यार्थ्यांना नेट व सेट परीक्षेच्या तयारीबाबत मार्गदर्शन करीत असतात. भाषा अभ्यास प्रशाळेतील मराठी, हिंदी व इंग्रजी विषयांचे एकूणच अभ्यासक्रम या पध्दतीने तयार करण्यात आलेले आहेत की, विद्यार्थ्यांची नेट व सेट परीक्षेसाठी स्पर्धात्मक परीक्षेसाठीची पण जास्तीची तयारी होत असते. प्रशाळेत वर्षभर होणारे कार्यक्रमसुध्दा विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासाच्यादृष्टीने आयोजित केले जातात. त्या व्यतिरिक्त भित्ती पत्रके, माजी विद्यार्थी संमेलन, नोकरी/व्यवसाय मार्गदर्शन अशा अनेक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळत असते व यश प्राप्तीसाठी त्यांना सातत्याने प्रेरित केले जात असते. प्रशाळेतील सेट मध्ये यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रशाळेतील अध्यापकांनी तसेच कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव आदींनी अभिनंदन केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ३ जुलै, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी